# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 06.12.2025** **वार- शनिवार**

---

**<u>आंबेडकर</u>**

महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज पुणे जिल्ह्यात त्यांना विविध कार्यक्रमांद्वारे आदरांजली वाहण्यात येत आहे. संविधानानुसार समाजनिर्मिती हीच आपली दिशा आणि ध्येय असायला पाहिजे असं प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात डॉक्टर रमेश पांडव यांनी महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात केलं. यावेळी विविध शैक्षणिक आणि प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर सेवक, विविध कर्मचारी आणि विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येनं विद्यार्थी उपस्थित होते. पुण्यातील स्टेशन परिसरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक इथं अभिवादन करण्यासाठी भीम अनुयायांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. महापालिकेच्यावतीने अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी डॉक्टर आंबेडकरांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

आकाशवाणी पुणे केंद्रात, कर्मचारी वर्गाद्वारे पुष्पांजली अर्पण करून डॉक्टर आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आलं.

**<u>पिंचि</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील डॉक्टर आंबेडकर यांच्या प्रतिमेला तसंच भीमसृष्टी पिंपरी चौक, इथल्या पुतळ्याला अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**<u>पुरस्कार</u>**

महापुरुषांचा जन्म कोणत्याही जाती-धर्मात झाला असला तरी त्यांनी कधी जात-पात-धर्म याचा विचार न करता सत्याचा धर्म अवलंबिला. महापुरुषांच्या विधायक कार्याचा वारसा पुढे नेत, चांगल्या विचारांची बांधणी करत देशाची नव्यानं उभारणी करण्याची खऱ्या अर्थानं आज गरज आहे, असं प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉक्टर श्रीपाल सबनीस यांनी आज पुण्यात केलं. फुले-शाहू-आंबेडकर विचार मंचातर्फे रमाई महोत्सवाचे अध्यक्ष ॲडवोकेट प्रमोद आडकर यांचा भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार देऊन गौरव करताना डॉक्टर सबनीस बोलत होते. सत्काराला उत्तर देताना आडकर म्हणाले की डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारच देशाला तारणार आहेत.

**<u>जीएसटी</u>**

पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३२ गावांमधून वसूल होणाऱ्या 'जीएसटी' चा हिस्सा अद्याप महापालिकेला मिळालेला नाही. त्यामुळं एकंदर २ हजार कोटी रुपयांचा हा निधी मिळण्यासाठी महापालिकेकडून पुन्हा एकदा राज्य सरकारला पत्र पाठविण्यात येणार आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी ही माहिती दिली. जकात आणि एलबीटी बंद झाल्यानंतर झालेल्या महसुली नुकसानाची भरपाई म्हणून शासनाकडून एलबीटी प्रतिपूर्ती अनुदान दिलं जातं. हे अनुदान शहरातून वसूल होणाऱ्या जीएसटीच्या हिश्श्यातून दिलं जातं. सध्या हा हिस्सा फक्त महापालिकेच्या जुन्या हद्दीतील वसुलीवर आधारित दिला जातो.

**<u>आंबा</u>**

पुणे जिल्ह्याच्या जुन्नर तालुक्यातील बुचकेवाडी इथले प्रयोगशील शेतकरी भरत जाधव यांनी विकसित केलेल्या 'जुन्नर गोल्ड' या विशेष आंब्याच्या वाणाला केंद्र शासनाकडून शेतकरी जात म्हणून अधिकृत मान्यता मिळाल्याची माहिती कृषी विज्ञान केंद्राचे अध्यक्ष अनिल मेहेर यांनी दिली आहे. जाधव यांच्याकडे हापूस, केशर, राजापुरी, बदामी, लंगडा अशा विविध वाणांची चारशेपेक्षा जास्त झाडं आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सीताफळ, डाळिंब यांसारखी फळपिकं घेत जाधव यांनी कृषी क्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

**<u>पालिका</u>**

पुणे महापालिकेच्या आगामी निवडणुकांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्यावतीनं जाहीरनामा तयार करण्यासाठी १४ जणांची समिती नेमली आहे. जाहीरनामा समितीमध्ये शहराध्यक्ष, आमदार, माजी महापौर, माजी सभागृह नेत्यांचा समावेश आहे. वाहतूक,पायाभूत सुविधा,पाणी पुरवठा,कचरा व्यवस्थापन,आरोग्य,शिक्षण,उद्यानं,सांस्कृतिक, क्रीडा, स्मार्ट तंत्रज्ञान, महिलांची सुरक्षा यासह सर्व क्षेत्रांतील ठोस उपाययोजना जाहीरनाम्यात मांडल्या जाणार आहेत.

**<u>वक्फ</u>**

केंद्रीय संरक्षण मंत्रालयाच्या अखत्यारीतील आणि पुणे कँटोन्मेंट बोर्डाच्या व्यवस्थापनातील काही जमिनींचं बेकायदेशीरपणे वक्फ मालमत्ता म्हणून वर्गीकरण केल्याच्या प्रकरणाची तातडीनं चौकशी करावी, अशी मागणी राज्यसभा खासदार प्राध्यापक डॉक्टर मेधा कुलकर्णी यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी काल नवी दिल्लीत संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांची भेट घेऊन एक निवेदन सादर केलं. काही दिवसांपूर्वी डिमॉस फाउंडेशन-सेंटर फॉर रिसर्च इन ह्यूमॅनिटीज संस्थेनं याबाबत सविस्तर शिफारसी आणि निवेदन दिलं आहे. तसंच पुणे कँटोन्मेंटमधील अनेक नागरिकांनी तक्रारी नोंदवल्या आहेत.

**<u>मॅराथन</u>**

एकोणचाळिसावी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा उद्या पहाटे तीन वाजता सणस मैदानापासून सुरू होणार आहे. स्पर्धेत 70 परदेशी धावपटूंसह देशभरातून पंधराहजार धावपटू सहभागी होण्याची शक्यता आहे. पूर्ण मॅरेथॉन, अर्ध मॅरेथॉन, महिला आणि पुरुष गट, दहा किलोमीटर, पाच किलोमीटर आणि व्हील चेअर अशा गटांमध्ये ही स्पर्धा होणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना तीस लाख रुपयांपर्यंत पारितोषिक पुणे महापालिकेच्यावतीनं देण्यात येणार आहेत. स्पर्धेसाठी पुणे पोलीस वाहतूक यंत्रणा शहरातील रुग्णालयं, 25 खाटांचे लघु रुग्णालय अशा विविध यंत्रणा कार्यरत असणार आहेत.

**<u>इंडिगो</u>**

इंडिगोच्या या प्रवासी वाहतूक विमान कंपनीचं वेळापत्रक विस्कळीत झाल्याचा सर्वाधिक फटका पुणे विमानतळाला बसला आहे. यामुळे हजारो प्रवाशांना ताटकळत बसावं लागत आहे. विमान उड्डाणात कामाच्या वेळेची मर्यादा घातल्यानं वैमानिक उपलब्ध नसल्यानं इंडिगो एअरलाइन्सची सेवा जवळपास ठप्प झाली आहे. पुण्यात आजही ४२ विमानांचं उड्डाण रद्द झालं असून तिकीट दर एक लाखांवर पोहोचलेत.

**<u>रेल्व</u>**

वाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी, मध्य रेल्वेनं पुणे  बंगळुरू आणि पुणे-हजरत निजामुद्दीन दरम्यान आजपासून 9 तारखेपर्यंत विशेष शुल्क आकारून विशेष गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**